कै. नामदेव वठारे रंगमंचावर नाट्य परिषद अमरावती शाखेची "धर्म", अकोला शाखेची "सबजेक्ट", पुणे शाखेची "आत्म्याला मुक्ती भेटलीच पाहिजे", पुणे उपनगरीय शाखेची "अगंतुक" या एकांकिका सादर करण्यात आल्या. त्यानंतर एकांकिका स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. त्यानंतर अहमदनगर शाखेची "पोएटिक जस्टीज", बेळगाव शाखेची "ना तलाक शुदा ना शादी शुदा", ठाणे शाखेची "सायली पेंडसे ब्रिस्टो", आय.एल.एस. लॉ कॉलेज, पुणे यांची "एण्ड्रील", मिजर शाखा, "सल", आय.एम.सी.सी., "बागुल बुवा", ललित कला केंद्र पुणे विद्यापीठ यांची "डेथ ऑफ अ सेल्समन" व त्यानंतर मुंबई मराठी साहित्य संघाचे "संत गोरा कुंभार" हे संगीत नाटक सादर करण्यात आले.

"हौशी नाटके, प्रायोगिक नाटके, किती हौशी? किती प्रायोगिक?" हा परिसंवाद त्यानंतर गीत गोविंद, निवडक पु.ल. हे कार्यक्रम कै. रा. ना. पवार रंगमंचावर सादर करण्यात आले.

कै. चंदूलाल श्रावण रंगमंचावर बाल रंगभूमीला चांगले दिवस येण्यासाठी आम्ही काय करु शकतो? हा परिसंवाद सादर करण्यात आला.

## एकदा पहावं करून..........

अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या रात्री अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मध्यवर्ती निर्मित श्री. रत्नाकर मतकरी लिखित व विजय केंकरे दिग्दर्शित "एकदा पहावं करून" हे सदाबहार नाटक सादर करण्यात आले. त्याला नाट्य रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## खुले अधिवेशन आणि समारोप समारंभ

रसिकांची प्रचंड गर्दी, उत्साहाला आलेले उधाण, कलाकारांची लक्षणीय उपस्थिती, विविध कार्यक्रमांची रेलचेल अशा पार्श्वभूमीवर नाट्य संमेलनाचा समारोप समारंभ सुरू झाला. संमेलनाच्या समारोपासाठी मान्यवर व्यासपीठावर आले तेव्हा या सर्व भावभावनांचे प्रतिबिंब समोरच्या रसिकवृंदात दिसत होते.

समारोपासाठी उपस्थित असलेले मान्यवर केंद्रीय ऊर्जा मंत्री मा.ना.श्री. सुशीलकुमार शिंदे, खासदार रामदास आठवले यांची भाषणे झाली. तत्पपूर्वी प्रमुख कार्यवाह श्री. प्रदीप कबरे यांनी प्रास्ताविक सादर केले.

नाट्य परिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी यांनी सोलापूर येथील रसिकांच्या प्रतिसादामुळे आणि कलाकारांच्या उत्स्फूर्त उपस्थितीमुळे नाट्य संमेलन यशस्वी झाल्याचे सांगितले व सर्व मान्यवरांचे, कलाकारांचे व रसिकांचे आभार मानले. संमेलनाध्यक्ष श्री. रमेश देव यांनी नाट्य परिषदेच्या रुग्णालयासाठी व घरांसाठी भूखंड देण्याचे मान्य केल्याबद्दल सरकारचे आभार मानले.

या संमेलनात प्रतिवर्षीप्रमाणे खुले अधिवेशन संपन्न झाले. वयोवृध्द रंगकर्मींना शासनातर्फे देण्यात येणाऱ्या मानधनात वाढ करण्यात यावी. तसेच मराठी रंगकर्मींसाठी महाराष्ट्र शासनाने लवकरात लवकर भूखंड उपलब्ध करून द्यावा. तिकीट विक्री परवाना तसेच सादरीकरण परवाना यातील अडथळे दूर करावेत, प्रत्येक तालुक्यात ॲम्पी थिएटरची उभारणी करण्यात यावी अशा ठरावासह आठ ठराव या अधिवेशनात मंजूर करण्यात आले.